प्रेसनोट दि. १०/०१/२०२५

**ॲन्टी करप्शनच्या पुणे घटकाकडून कृषी आयुक्तालय, पुणे येथील उपसंचालक, फलोत्पादन - ४ याना लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी ताब्यात घेतले.**

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये. |
| तक्रारदार | पुरुष, वय ५१ वर्ष |
| आरोपीचे नाव व कार्यालय | संजय बहादू गुंजाळ, उपसंचालक, फलोत्पादन-४ व प्रभारी सहसंचालक, फलोत्पादन, कृषी आयुक्त कार्यालय, शिवाजीनगर पुणे. (वर्ग-१) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ३,००,०००/- रुपये लाच मागणी |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | २,५०,०००/- |
| स्वीकारलेली लाच रक्कम | २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार) रुपये |
| पडताळणी दिनांक | दि. १०/०१/२०२५ रोजी |
| सापळा दिनांक | दि. १०/०१/२०२५ |
| ठिकाण | खुराणा खाजगी ट्रॅव्हल्स ऑफीसच्या समोर रस्त्यावर, संगमवाडी, पुणे. |
| तपास अधिकारी | श्री. प्रविण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, लाप्रवि. पुणे. (मो.क्र. ९५५२५७४१४०) |

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार हे सन २०१९-२०२० मध्ये तालुका कृषी अधिकारी जळगाव जामोद जिल्हा बुलढाणा या कार्यालयात कनिष्ठ लिपीक या पदावर कार्यरत असताना त्यांनी सुक्ष्म सिंचन (ठिबक सिंचन) च्या प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेमध्ये केलेल्या कसुरीच्या अनुषंगाने झालेल्या चौकशीअंती कृषी सहसंचालक, अमरावती विभाग, अमरावती यांनी त्यांना दि. १७/१२/२०२४ रोजी सेवेतून निलंबित केलेले आहे.

यातील लोकसेवक संजय गुंजाळ हे कृषी आयुक्तालय, पुणे या ठिकाणी उपसंचालक, फलोत्पादन - ४ म्हणून नेमणुकीस आहेत. त्यांनी तक्रारदाराकडे त्यांच्यावर झालेल्या निलंबनाच्या कारवाईमध्ये मदत करण्यासाठी तसेच तक्रारदाराविरुद्ध ठेवलेल्या आक्षेपांच्या अनुषंगाने चौकशी करुन एफ.आय.आर. दाखल न करण्यासाठी ३,००,०००/- (तीन लाख) रुपये लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. पुणे येथे केली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक संजय गुंजाळ यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांच्या निलंबनानंतरच्या कारवाईमध्ये मदत करण्यासाठी आणि त्याच्याविरुद्ध एफ.आय.आर. दाखल न करण्यासाठी सुरुवातीस ३,००,०००/- रुपये लाचेची मागणी करुन, तडजोडीअंती २,५०,०००/- रुपयाच्या लाचेची मागणी करुन, तक्रारदार यांचेकडून रुपये २,५०,०००/- (दोन लाख पन्नास हजार) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारली असता त्याना ताब्यात घेण्यात आले आहे.

त्यावेळी आरोपी लोकसेवक संजय गुंजाळ यांचे ताब्यातील FORD ECO SPORT कार क्रमांक MH 15 / GF / 3852 ची तपासणी केली असता, कारमध्ये लाच रक्कम सोडून २,१५,०००/- रुपये रोख मिळून आली.

लोकसेवक संजय गुंजाळ यांचेविरुद्ध येरवडा पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७ अन्वये गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, अपर पोलीस अधीक्षक श्री. विजय चौधरी ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
२) व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
३) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
४) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
५) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

10/1/25
(दयानंद गावडे)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक, (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.

सहायक पो. आयुक्त/पोलीस उप-अधिक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो सत्यमेव जयते